महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

**(गृह शाखा)**

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001
दूरध्वनी क्रमांक - 0257- 2220152
ई मेल - homebranchjalgaon@gmail.com

वाचले :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005
2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020
4. या कार्यालयाकडील आदेश क्र. क्र दंडप्र-01/कावि/2020/186 दिनांक 3 मे, 2020
5.या कार्यालयाकडील आदेश क्र. क्र दंडप्र-01/कावि/2020/195 दिनांक 9 मे, 2020
6. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 17 मे, 2020

---0000---

क्र दंडप्र-01/कावि/2020/222

दिनांक 17 मे, 2020

## -: आदेश :-

ज्याअर्थी, उपोदूघातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोदूघातात नमूद महाराष्ट्र शासनाकडील आदेश दिनांक 17 मे, 2020 अन्वये लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 18 मे, 2020 पासून दिनांक 31 मे, 2020 पावेतो वाढविण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी, करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा भाग म्हणून दिनांक 17 मे, 2020 पावेतो मुदत असलेले आदेश या कार्यालयामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आहेत.

त्याअर्थी, मी, **डॉ. अविनाश ढाकणे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील प्रमाणे नमूद केलेल्या आदेशांना **दिनांक 31 मे, 2020** पावेतो मुदतवाढ देत आहे.

| अ.क्र | विषय | आदेश क्रमांक व दिनांक | आदेशाचा कालावधी | मुदतवाढ दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | जळगांव जिल्हा हद्दीत प्रवेश व जळगांव जिल्हयातून निर्गमन करण्यास प्रतिबंध (सिमा बंदी) | दंडप्र-01/कावि/2020 /57 दिनांक 14 एप्रिल, 2020 | दि. 17 मे, 2020 | दिनांक 31 मे, 2020 |
| 2 | जळगांव जिल्हयातील सर्व उद्योग/ कारखाने/कंपनी व तत्सम आस्थापना (अत्यावश्यक वस्तू व सेवा पुरविणा-या कंपन्या/ कारखाने/ उद्योग/व्यवसाय वगळून) पूर्णपणे बंद करण्याबाबत. **सदरचा आदेश हा ग्रामिण भाग , महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रातील** | दंडप्र-01/कावि/2020 /56 दिनांक 14 एप्रिल, 2020 | दि. 17 मे, 2020 | दिनांक 31 मे, 2020 |

Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | एमआय डीसी क्षेत्र , आयुध निर्माण कंपनी यांना वगळून उर्वरीत क्षेत्रातील औद्योगिक आस्थापनांसाठी लागू असेल. (संबंधित आस्थापनांना Containment Zone मधील कामगार कामावर घेता येणार नाहीत.) | | | |
| 3 | जळगांव शहर महानगरपालिका जळगांव ,जळगांव जिल्हयातील सर्व पेट्रोल/डिझेल पंपावर इंधन भरणेकामी वेळ, क्षेत्र व आवश्यकता निर्धारित केलेबाबतचा आदेश | दंडप्र-01/कावि/2020 /59 /2 दि. 14 एप्रिल, 2020 | दि. 17 मे, 2020 | दिनांक 31 मे, 2020 |

उपोद्घातात **नमूद महाराष्ट्र शासनाकडील आदेश दिनांक 02 मे, 2020 व दिनांक 03 मे, 2020 अन्वये जळगांव जिल्हयाचा समोवश हा <u>रेड झोन</u> मध्ये करण्यात** आलेला असून महाराष्ट्र शासनाकडील आदेश दिनांक 17 मे 2020 अन्वये लॉकडाऊन कालावधी हा **दिनांक 31 मे, 2020 पर्यंत** वाढविण्यात आलेला आहे.

**तथापि या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/ कावि/2020/186, दिनांक 03 मे, 2020 मधील बाबी कायम ठेवण्यात येत असून महाराष्ट्र शासनाकडील आदेश दिनांक 17 मे, 2020 मध्ये नमूद तरतुदींच्या अधिन राहून या कार्यालयाकडून निर्गमित करण्यात आलेले दिनांक 3 मे, 2020 च्या आदेशास दिनांक 31 मे, 2020 पावेतो मुदतवाढ देण्यात येत आहे.**

**तसेच या कार्यालयाकडील आदेश क्रमांक दंडप्र-01/ कावि/2020/195, दिनांक 09 मे, 2020 मधील नमूद खालील बाबींना देखील दिनांक 31 मे, 2020 पावेतो मुदतवाढ देण्यात येत आहे.**

1) <u>जळगांव शहर महानगरपालिका जळगांव व चोपडा, अमळनेर, भुसावळ, पाचोरा, यावल, फैजपूर, धरणगांव, भडगांव या नगरपालिका / नगरपरिषद</u> यांच्या कार्यक्षेत्रातील केवळ अत्यावश्यक वस्तू व सेवा (Essential Commodities- उदा. अन्न, औषधे) पुरविणा-या आस्थापना / दुकाने / यंत्रणा **सकाळी 07.00 ते सायंकाळी 07.00** या वेळेतच सुरु राहतील.
2) वर नमूद केल्यानुसार अत्यावश्यक वस्तू व सेवा (Essential Commodities) पुरविणा-या आस्थापना / दुकाने / यंत्रणा वगळता अन्य कोणत्याही प्रकारचे दुकाने / आस्थापना / यंत्रणा सुरु ठेवता येणार नाहीत.
3) उपरोक्त नमूद कार्यक्षेत्रातील पेट्रोल / डिझेल पंप केवळ सकाळी 07.00 ते सायंकाळी 07.00 या वेळेतच सुरु राहतील. तथापि महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत क्षेत्राबाहेरील राष्ट्रीय महामार्ग व राज्य मार्गावरील पेट्रोल / डिझेल पंपांना सदरची अट लागू असणार नाही.
4) उक्त नमूद क्षेत्रातील रेशनचा पुरवठा करणारी स्वस्त धान्य दुकाने, कृषीशी संबंधित सर्व दुकाने सुरु राहतील.
5) सदरचा आदेश हा लॉकडाऊन कालावधीमध्ये सुरु ठेवण्याकरीता एमआयडीसी प्राधिकरणाने मंजूरी दिलेल्या कंपन्या / इंडस्ट्रीज / औद्योगिक संस्था / उद्योग यांना लागू असणार नाही. तथापि कोणत्याही उद्योग / आस्थापनांना Containment Zone म्हणून घोषित करण्यात आलेल्या क्षेत्रामधील कामगार / कर्मचारी यांना कामावर घेता येणार नाही.
6) उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे अत्यावश्यक वस्तू व सेवा यांची दुकाने सुरु ठेवतांना दुकानांमधील काऊंटरवर केवळ एकच व्यक्ती राहील, अन्य सर्व व्यक्ती दुकानाच्या बाहेर Social Distancing चे पालन करुन रांगेत उभे राहतील, याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित दुकानदारांची राहील. तथापि सदर बाबीचा भंग केल्यास कसूरदार दुकान हे दिनांक 31 मे, 2020 पर्यंत तात्काळ बंद करण्याची कार्यवाही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांनी करावी.

Scanned with CamScanner

7) **जळगांव जिल्हयात Containment Zone म्हणून घोषित करण्यात आलेल्या क्षेत्रात व भविष्यात अशा प्रकारे Containment Zone म्हणून घोषित करण्यात येणा-या सर्वच क्षेत्रामध्ये केवळ औषधी दुकाने (Medical Stores), केवळ In-patient Department करीता रुग्णालये / हॉस्पिटल्स सुरु राहतील. (OPD सुरु असणार नाही). याव्यतीरिक्त सर्व Containment Zone मध्ये कोणतीही आस्थापना / बँका / पेट्रोलपंप व सर्व प्रकारची दुकाने बंद राहतील.**

सदर आदेशाचे उल्लंघन अथवा भंग केल्यास सदर बाब ही आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897, भारतीय दंड संहिता, 1860 चे कलम 188 नुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा आज दिनांक 17 /05/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

(डॉ. अविनाश ढाकणे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, जळगांव
5. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
6. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
7. जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगांव
8. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
9. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
10. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
11. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,जळगांव
12. मुख्याधिकारी सर्व (नगरपालिका/नगरपंचायत)
13. सहायक कामगार आयुक्त,जळगांव
14. सहायक संचालक,अन्न व प्रशासन ,जळगांव
15. जिल्हा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र ,जळगांव
16. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,जळगांव
17. उप अभियंता, एम.आय.डी.सी.जळगांव

प्रत :- **जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

प्रत :- **जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.

Scanned with CamScanner